**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.९९६४/२०२३**

**निशाणी :**

**आरोपीचे निवेदन**

**१. अपराधाचा दिनांक** : ०३.०९.२०२३ रोजी

**२. फिर्याद / दाखल दिनांक** : २७.०९.२०२३ रोजी

**३. फिर्यादीचे नाव** : विजय हरबन्सलाल आरोरा
वय : ४५ वर्षे, धंदाः व्यापार,
रा. एन-७ सिडको, औरंगाबाद.

**४. आरोपीचे नाव** : विश्वास गंगाराम बोबडे
वय : ४८ वर्ष , धंदाः नोकरी,
रा. म्हाडा कॉलनी सिडको, एन-९, औरंगाबाद

**५. गुन्हयाचा तपशिल** :

फिर्यादी व तुमची ओळख शेअर्स मार्केट संबंधीत कारणांमुळे झाली. त्यानंतर तुमच्यामध्ये मैत्रीचे नाते प्रस्थापीत झाले. तुम्ही मार्च २०२३ मध्ये फिर्यादीकडे रक्कम रुपये ५,००,०००/- हातऊसने मागीतले व सदरची रक्कम तीन महिन्यामध्ये परत फेड करणार असल्याचे सांगीतले. तुमच्या मागणीनुसार फिर्यादीने तुम्हाला रक्कम रु. ५,००,०००/- दिनांक २५.०३.२०२३ रोजी दिले. त्यानंतर सदरची रक्कम परत करण्याकरिता तुम्ही दिनांक १०.०६.२०२३ रोजी रक्कम रुपये ५००,०००/- चा धनादेश क्र.४७५७२३ हा तुम्ही फिर्यादीला लिहून दिला. फिर्यादीने सदरचा धनादेश वटण्याकरिता त्याचे खात्यात भरला असता सदरचा धनादेश हा दिनांक ०२.०८.२०२३ रोजी अपुरा निधी असा शेरानिशी परत आला. त्यानंतर फिर्यादीने तुम्हाला दिनांक १८.०८.२०२३ रोजी कायदेशीर नोटीस पाठवली. सदरची नोटीस तुम्ही स्वीकारलेली नाही त्यामुळे तसा शेरा मारुन सदरची नोटीस फिर्यादीला परत मिळाली. त्यामुळे तुम्ही दिनांक १९.०८.२०२३ रोजी नोटीस स्वीकारण्यास नकार दिल्याने सदरची नोटीस तुम्हाला दिनांक १९.०८.२०२३ रोजी मिळालेली आहे. त्यानंतर देखील १५ दिवसांचे आत धनादेशाची रक्कम देण्याबाबत तुम्ही तजवीज केली नाही. त्यामुळे तुम्ही फिर्यादीस न वटणारा धनादेश देऊन त्याद्वारे निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात केला.

**आरोपीचे निवेदन :**

१. तुम्हाला खटल्यातील नकला मिळाल्यात काय ?

उत्तर : नाही

२. तुम्हाला आता वाचून दाखवलेला गुन्हयाचा तपशील समजला काय ?

उत्तर : होय

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : नाही

..................................

**आरोपीची सही**

**माझ्या समक्ष**

12/12/2023

**(समीर गोपाळ गुणारी)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**(न्यायालय क्र.१९) औरंगाबाद**

**दिनांक : १२.१२.२०२३**

**ठिकाण : औरंगाबाद**